N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** यवतमाळ **P.S.(ठाणे):** राळेगांव
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0007 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 06/01/2025 20:54

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 06/01/2025
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 06/01/2025
**Time From (वेळेपासून):** 11:19 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:34 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 06/01/2025 **Time (वेळ):** 20:35 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 024
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/01/2025 20:35 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** उपअधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालि,राळेगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विलास सुर्यभान कोरडे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1977
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नंदुरकर लेआउट, वडकी,राळेगाव,राळेगाव,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | नंदुरकर लेआउट, वडकी,राळेगाव,राळेगाव,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-7498884659

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अजय नारायणराव देशमुख | | | 1. प्लॉट क्रमांक 27हर्षवर्धन सोस, मारोती शोरूमच्या मागे यवतमाळ,यवतमाळ शहर, यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | कागदपत्रे आणि मुल्यवान | इतर कोणतीही कागदपत्रे | तक्रारदार यांचा अर्ज व प्रतिज्ञा पत्र | 0.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | रोखे | | | |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु च्या 20 चलनी नोटा | 10,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

10,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

अप.नं - / 2025 कलम 7 भष्ट्राचार प्रतिबंधक अधिनियम 1988
फिर्यादी –विलास सुर्यभान कोरडे, वय 48 वर्ष, धंदा शेती, रा. नंदुरकर लेआउट, वडकी, ता.राळेगांव, जि. यवतमाळ, मो.क्र. 7498884659
आरोपी – अजय नारायणराव देशमुख, वय 50 वर्ष, पद परिरक्षण भुमापक, उपअधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, राळेगांव रा. प्लॉट क्रमांक 27 हर्षवर्धन सोसायटी, मारोती शोरुमच्या मागे दारव्हा रोड, यवतमाळ
घटनास्थळ – उपअधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, राळेगांव
घ.ता वेळ – दि. 06/1/2025 चे 11/19 वा ते 14/34 वा
दा.ता वेळ – दि. 06/1/2025 चे
कायमी – मपोहवा 1899/ माधुरी मसराम पो स्टे राळेगाव
तपास – पोनि घनवट सा ACB यवतमाळ
ममिळालेला माल -- कागदपत्र व नगदी 10000/- रु चा माल
हकीकत –फिर्याद अँ.क.ब्युरो, यवतमाळ कॅम्प – राळेगांव दिनांक: 06/01/2025माझे नांव:- विलास सुर्यभान कोरडे, वय 48 वर्ष, धंदा शेती, रा. नंदुरकर लेआउट, वडकी, ता.राळेगांव, जि. यवतमाळ, मो.क्र. 7498884659मी वरील ठिकाणी माझे कुंटुंबासह राहत असुन शेतीचा व्यवसाय करतो मी दिनांक 03/01/2025 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, यवतमाळ येथे जावून लाच मागणीबाबत लेखी तक्रार दिली होती की, ती पुढील प्रमाणे आहे.आमचे वडीलोपाजित वडकी गावात सामाईक जुने घर आहे. त्या घराचे आम्ही सर्व भाउ व बहीणी असे वारसदार आहोत. आमच्या वडीलांचे निधन झालेले असुन आमची आई श्रीमती अनुसया सुर्यभान कोरडे हीचे दिनांक 21/03/2023 रोजी वृध्दापकाळाने निधन झाले आहे. आमच्या आईच्या मृत्यु नंतर आमच्या सामाईक असलेल्या वडीलोपार्जित जुन्या घराच्या मिळकतीवर आमची आई मयत झाल्याबाबत नोंद घेण्यात आली आहे. परंतु आमच्या आईचे नांव अद्यापही मिळकतीरुन कमी केलेले नाही. त्यामुळे मी भुमी अभिलेख कार्यालय, राळेगांव येथे दिनांक 27/12/2024 रोजी कार्यकारी दंडाधिकारी राळेगांव यांचे नांवे शपथपत्र तयार करुन रितसर अर्ज भुमी अभिलेख कार्यालयात दिला आहे. तेथील भुमी अभिलेख कार्यालयात काम करणारे बाबु नामे श्री.देशमुख याने मला माझ्या कामा करीता 10,000/- रुपयाची लाचेची मागणी केलेली आहे. तरी भुमी अभिलेख कार्यालय, राळेगांव येथे काम करणारे बाबु नामे श्री.देशमुख यांनी मला वडीलोपार्जित जुन्या घराच्या मिळकतीवरुन आमच्या मयत आईच्या नावाची नोंद कमी करण्याकरीता 10,000 रूपये लाचेची मागणी केली आहे. मला त्यांना लाचेची रक्कम दयावयाची नसल्याने मी त्यांचे विरुध्द आज रोजी लाच मागणीची तक्रार देत आहे. माझी व श्री.देशमुख बाबु, भुमी अभिलेख कार्यालय, राळेगांव यांचे मध्ये दुश्मनी नसुन देवाणघेवाणीचा उसणवारीचा कोणताही व्यवहार आमचे मध्ये नाही. तरी त्यांनी मला लाचेची मागणी केल्यास व स्विकारल्यास त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी ही विनंती. मी माझे तक्रारीसोबत भुमी अभिलेख कार्यालय,राळेगांव येथे दिलेले अर्ज,प्रतिज्ञापत्र, शपथपत्र, वारसांचा दाखला,मृत्यु प्रमाणपत्र व मालमत्ता पत्रक यांची छायांकीत सत्यप्रत यासोबत सादर करीत आहे. मी व माझे मित्र श्री. निखील अशोकराव शेळके, धंदा शेती, पोस्ट चाहांद, ता. राळेगांव, जिल्हा यवतमाळ हे सदर कामा करीता श्री. देशमुख बाबु, भुमी अभिलेख कार्यालय, राळेगांव यांना अर्ज दिल्यानंतर भेटलो असता त्यांनी त्यावेळी माझे कामा

करीता 10,000 रूपयाची मागणी केली होती. मात्र मला लोकसेवकाला लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी तक्रार देण्याकरीता दिनांक 03/01/2025 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, यवतमाळ येथे गेलो होतो व त्यांना माझी लेखी तक्रार दिली होती. मी तक्रार द्यायला गेलो त्यादिवशी श्री. निखील अशोकराव शेळके हे त्यांच्या खाजगी कामात व्यस्त असल्याने माझे सोबत आले नव्हते.
मी दिनांक 03/01/2025 रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने अँन्टी करप्शन ब्युरो,यवतमाळ येथील पोलीस निरीक्षक, श्री. अर्जुन घनवट यांनी दोन शासकीय पंच बोलावुन माझी व त्यांची ओळख करून दिली. व मी त्यांना माझी तक्रार वरील प्रमाणे सांगीतली. यानंतर मी पोलीस निरीक्षक श्री.घनवट यांना पंचासमक्ष सांगीतले की, "श्री. देशमुख हे दुपारी चार पर्यंतच त्यांचे कार्यालयात हजर राहतात, त्यामुळे आज त्यांची भेट होणे शक्य नाही, तेव्हा सोमवारी दिनांक 06/01/2025 रोजी पडताळणी करण्यात यावी," अशी विनंती केल्याने, माझे तक्रारीची पडताळणी सोमवार दिनांक 06/01/2025 करण्याचे ठरले. यानंतर पोलीस निरीक्षक श्री.घनवट यांनी मला व पंचाना गोपनियते बाबत सुचना दिल्या.
पडताळणी पुर्व पंचनामा दिनांक 03/01/2025 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, यवतमाळ येथे करण्यात आला.
त्यानंतर दि.06/01/2025 रोजी मी तसेच पोलीस निरीक्षक श्री.घनवट, दोन पंच व स्टाफ असे राळेगांव येथे हजर आलो व मी दिलेल्या तक्रारी वरून पंच यांचेसमक्ष लाचमागणी पडताळणी कार्यवाही केली असता पडताळणी दरम्यान श्री. अजय नारायणराव देशमुख, यांनी माझेकडे 10,000/-रु. लाच रक्कमेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले. व सदरची लाच रक्कम आजच घेवुन या असे त्यांनी मला सांगितल्याने मी त्यांना होकार दिल्याने आजच सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.
त्यावरून आज दि.06/01/2025 रोजी मी 500/- रुपये दराच्या 20 नोटा असे एकुण 10,000/-रु. जमवुन पोलीस निरीक्षक श्री.घनवट यांचे कडे सापळा कार्यवाही करीता हजर केले असता पोना श्री. राकेश सावसाकडे यांनी सदर नोटांना मी, पंच व पोलीस स्टॉफ यांचे समक्ष अँन्थ्रासीन पावडर लावली व 14/14 ते 14/34 वा. दरम्यान उपअधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, राळेगांव येथे आलोसे यांचे कक्षात सापळा कार्यवाही आजमावली असता सदर सापळा कार्यवाही दरम्यान मी व पंच क्र.1 श्री. प्रल्हाद मुंढे यांचेसह श्री. अजय नारायणराव देशमुख, परिरक्षण भुमापक, उपअधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, राळेगांव यांची भेट घेतली असता त्यांनी माझे जवळील 10,000 /- रु. लाच रक्कम मी केलेल्या अर्जात ठेवण्याचे सांगुन लाच स्विकारली. त्यावेळी पंच क्रमांक 1 श्री.मुंढे हे माझेसोबत होते व श्री.देशमुख यांच्या कार्यालयाचे बाहेरून घडलेली सर्व घटना पाहात व ऐकत होते. त्यानंतर मी त्यांच्या कक्षाच्या बाहेर आलो व कार्यालयाच्या बाहेर येवुन सापळा लावलेल्या अधिकारी व अंमलदार यांना लाच रक्कम स्विकारल्याचा डाव्या हाताने केसावर हात फिरवून नियोजीत इशारा दिला असता अँन्टी करप्शन ब्युरो, यवतमाळ च्या अधिकारी व अंमलदार यांनी श्री. अजय नारायणराव देशमुख, परिरक्षण भुमापक, उपअधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, राळेगांव यांना ताब्यात घेवुन दोन्ही पंचासमक्ष लोकसेवक यांनी त्यांच्या टेबलावर ठेवलेले तक्रारदार यांच्या अर्जामध्ये 500/- रुपये दराच्या 20 नोटा असे एकुण 10,000/- रु. व लाच रक्कम स्विकारलेले कागदपत्र ताब्यात घेवून जप्त करून पुढील कार्यवाही केली.
एकंदरीत दि.06/01/2025 रोजी 11/19 वा. ते 14/34 वा. दरम्यान श्री. अजय नारायणराव देशमुख, परिरक्षण भुमापक, उपअधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, राळेगांव यांनी मला वडीलोपार्जित जुन्या घराच्या मिळकतीवरून आमच्या मयत आईच्या नावाची नोंद कमी करण्याकरीता पडताळणी कार्यवाही दरम्यान 10,000 रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली तसेच प्रत्यक्ष सापळा कार्यवाही दरम्यान श्री. अजय नारायणराव देशमुख यांनी उपअधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, राळेगांव येथील त्यांचे कक्षामध्ये माझे कडुन लाच रक्कम 10,000/- रु. स्विकारल्याने माझी श्री. अजय नारायणराव देशमुख, वय 50 वर्ष, पद परिरक्षण भुमापक, उपअधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, राळेगांव रा. प्लॉट क्रमांक 27 हर्षवर्धन सोसायटी, मारोती शोरूमच्या मागे दारव्हा रोड, यवतमाळ यांचेविरुध्द पुढील कायदेशिर कार्यवाही होणेकरीता माझी फिर्याद आहे.अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन व मा पोनि सा यांचे आदेशाने सदरचा गुन्हा नोंद करुन पुढील तपासकामी अँन्टी करप्शन ब्युरो यवतमाळ यांनी घेतला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SITARAM MANJAJI MEHETRE(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

कि. रु कोरडे

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SITARAM MANJAJI MI

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PI

आसाराम
1899

ठाणे अमलदार
पो.स्टे. राळेगांव